**सं.फौ.ख.क्र.११९४३/२०२३**
**महेश वि.मे.गुरू तेग बहादूर सेल्स**
**नि.क्र. ९ खाली**

**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ विजय लिलाराम गोलानी चा शपथेवर सरतपास फिर्यादीचे विधीज्ञ श्री. यांच्यामार्फत सुरु –**

माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. तो वाचून मी त्यावर सही केलेली आहे. तो **निशाणी क्र.९** वर आहे.

२. मी यादी निशाणी ११ सोबत दस्त दाखल केले आहेत. दस्त क्र.१ वर फिर्यादीने माझ्या हक्कात तयार करुन दिलेले मूखत्यारपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१२** देण्यात येत आहे. दस्त क्र.२ वर आरोपीने दिलेला धनादेश आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१३** देण्यात येत आहे. दस्त क्र.३ वर धनादेश वठविण्याकरीता बँकेत जमा केला असता सदर धनादेश अपूरा निधी या कारणास्तव चेक रिटर्न मेमोसह परत आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१४** देण्यात येत आहे. दस्त क्र.४ वर मी माझ्या वकीलामार्फत आरोपीला पाठविलेल्या नोटीसची कार्यालयीन प्रत दाखल आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात येत आहे. दस्त क्र.५ ते ७ वर सदर नोटीस पाठविल्याबाबतच्या पोस्टाच्या तीन पावत्या दाखल आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास एकत्रितरित्या **निशाणी क्र.१६** देण्यात येत आहे. दस्त क्र.८ ते १० वर सदर नोटीस पाठविल्याबाबतच्या पोस्टाच्या तीन

पोचपावत्या दाखल आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास एकत्रितरित्या **निशाणी क्र.१७** देण्यात येत आहे. दस्त क्र.१४ अन्वये समझोतापत्राची अस्सलप्रत दाखल केली आहे. त्यावर फिर्यादी, आरोपी व साक्षीदार म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.१८** देण्यात येत आहे. दस्त क्र.११ ते १३ वर मी आरोपीने दिलेल्या धनादेश, ट्रान्सॅक्शन डिटेल व पावतीची फोटोकॉपी दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्याना अनू**.आर्टीकल–ए, बी, सी** देण्यात येत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपी व त्यांच्या वकीलांचा पूकारा केला असता गैरहजर, सबब उलटतपास पूढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष,

MUMTAJKHA BHUREKHA PATHAN

Digitally signed by MUMTAJKHA BHUREKHA PATHAN
Date: 2025.07.23 15:28:33 +0530

दि.२३.०७.२०२५ (एम.बी.पठाण)

नागपूर. ३०वे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर व

अतिरीक्त मूख्यन्यायदंडाधिकारी, नागपूर.